# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0508 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/11/2023 00:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Date From (दिनांक पासून):** 06/11/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 06/11/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Time From (वेळेपासून):** 16:20 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/11/2023 **Time (वेळ):** 20:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/11/2023 00:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय अमरावती

(c)**In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** मनोज सुरेशराव डकरे

**(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जुनी वस्ती बारीपुरा,बडनेरा जि अमरावती ,कोतवाली,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जुनी वस्ती बारीपुरा,बडनेरा जि अमरावती ,कोतवाली,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888580539

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे सारंग विलास पांडे | | | 1. दस्तुरनगर, ,अमरावती, कोतवाली,अमरावती शहर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 400 | 400.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

400.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अप नं व कलम – 508 /2023 कलम 7 भष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम 1988
फीर्यादी - मनोज सुरेशराव डकरे वय 35 वर्ष धंदा - मजुरी रा जुनी वस्ती बारीपुरा बडनेरा जि अमरावती मो नं 8888580539
आरोपी - आलोसे सारंग विलास पांडे, वय 33 वर्ष , पद - महसुल सहायक, तहसिल कार्यालय, अमरावती, रा. दस्तुरनगर, अमरावती
घटनास्थळ – तहसील कार्यालय अमरावती
घटना ता. वेळ – दि. 06/11/2023 चे 16.20 वा ते 16.50 वा दरम्यान
घटना दा.ता. वेळ – दि. 07/11/2023 चे

..........................................................................................

हकीकत अशा प्रकारे आहे की, दिनांक 06/11/2023 फिर्याद देणार: मनोज सुरेषराव डकरे, वय 35 वर्शे, धंदा- मजुरी शिक्षण - 9 वी, रा.जुनीवस्ती, बारीपुरा, बडनेरा, जि.अमरावती,मो.न.8888580539मी वर नमुद पत्यावर परिवारासह राहत असुन दिनांक 06/11/2023 रोजी अँन्टी करप्षन ब्युरो, अमरावती येथील पोलीस निरीक्षक श्रीमती विजया पंधरे यांचेकडे जावुन तक्रार दिली की, मी वरील पत्यावर राहत असुन मजुरीचे काम करतो. माझी आई श्रीमती कमल सुरेष डकरे हिने तिचे वडील कै.नारायणराव पेटले यांचे मौजे बडनेरा, ता.जि.अमरावती सव्र्हे नं. 68/2 मधील षेत जमीनीचे वादाबाबतचे प्रकरण उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचेकडे दाखल केले होते. सदर प्रकरणाबाबत अदयापावेतो काहीच कार्यवाही झाली नव्हती, त्यामध्ये माझे आईचे नावे उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचेकडून दिनांक 08/02/2023 रोजी आदेष पारीत करण्यात आला असलयाबाबत समज पत्र पोस्टव्दारे प्राप्त झाले होते. त्यामुळे मी माझे आईचे वतीने दिनांक 27/09/2023 रोजी वर नमुद प्रकरणाचे कागदपत्रे मिळणेकरीता तहसिल कार्यालय अमरावती येथील अभिलेख कक्षात रितसर अर्ज केला होता. त्यावेळी त्या कार्यालयात हजर असलेले षासकीय कर्मचारी श्री.पांडे (पुर्ण नाव माहिती नाही) यांनी मला 100/- रू. ची पावती फाडण्यास सांगितली. त्यानुसार मी 100/- रू. ची पावती रितसर फाडली असुन ती माझ्याकडे आहे. अषाप्रकारे अषी नियमाप्रमाणे फि भरून पावती घेतली असुन सुध्दा श्री.पांडे यानी मला ''500/- रूपये आणून दे आणि तुझे कागदपत्रे घेवुन जा" असे म्हटले. यापुर्वी सुध्दा श्री.पांडे यांनी वर नमुद शेतीच्या फेरफाराच्या नकलाकरीता अर्ज केला असता, त्यांनी माझेकडून एकवेळ 700/- रुपये घेवून 200/- रुपयाची व एकवेळ 500/- घेवून 100/- रुपयाची पावती मला दिली होती. त्यामुळे तहसिल कार्यालय, जि.अमरावती येथील कर्मचारी श्री.पांडे हे मला मी रितसर 100/- रूपये फि भरल्यानंतरही माझे कागदपत्रे देण्याकरीता 500/- रूपये लाचेची मागणी करीत असल्याने व सदरची लाच रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी त्यांचेविरुध्द कायदेषिर कारवाई होणेकरीता लेखी तक्रार दिली.

त्यानंतर श्रीमती विजया पंधरे, पोलीस निरीक्षक यांनी 2 षासकिय पंच बोलाविले व त्यांना माझा व मला त्यांचा 1) श्री.यशवंत रामटेके, वरिश्ठ लिपीक 2) श्री.आषिश माथुरकर, लिपीक, दोन्ही नेमणूक: प्रादेषिक परिवहन विभाग, अमरावती असा परिचय करुन दिला. त्यानंतर श्रीमती पंधरे यांनी माझी तक्रार पंचाना वाचणेस देवून मला माझे तक्रारीसंबंधाने थोडक्यात सांगणेस सांगितले. त्यानंतर पो.नि.पंधरे यांनी माझे तक्रारीनुसार श्री.पांडे यांची माझेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे ? याबाबत पडताळणी करणे आवष्यक असल्याचे सांगितले. त्यावेळी पो.ना.युवराज राठोड यांनी मला व पंचाना डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर दाखवुन त्याचा वापर व उपयोगाबाबत माहिती दिली. त्यानंतर श्रीमती विजया पंधरे यांनी मला पंच क्र.1 श्री.रामटेके यांचेसोबत तहसिल कार्यालय, अमरावती येथे श्री.पांडे यांची भेट घेणेकामी रवाना केले, त्यावेळी पो.ना.राठोड यांनी माझेजवळ डिजीटल व्हाईस रेकाॅर्डर सुरु करुन दिले. त्यानुसार मी व पंच क्र.1 श्री.रामटेके असे माझे दुचाकी वाहनाने तहसिल कार्यालय, अमरावती येथे गेलो व श्री.पांडे यांना भेटलो. त्यावेळी मी त्यांना माझे कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी मला माझे काम झाल्याचे

सांगुन पैष्याबाबत इषारा केला. त्यावेळी मी त्यांना 'काय म्हणता मंग सांगा ना सर' असे म्हटले असता त्यांनी मला ' पैसे भरा लागन ना चारषे रुपये झाले त्याचा हिशोब' असे म्हटले. त्यावेळी मी त्यांना शंभर रुपये भरल्याचे सांगितले असता आणखी चारषे रुपये लागतील असे म्हटले. त्यावेळी मी त्यांना 'पैसे एटीएम मधुन काढून येतो' असे म्हणून तेथून पंच क्र.1 श्री.रामटेके यांचेसह श्रीमती पंधरे यांचेकडे परत आलो. त्यानंतर श्रीमती पंधरे यांनी विचारलेनुसार मी व पंच क्र.1 श्री.रामटेके यांनी त्यांना घडलेली हकिकत सांगितली. त्यानंतर श्रीमती पंधरे यांचे सांगणेनुसार पो.ना. राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील संभाशण ऐकविले. त्यावरुन तहसिल कार्यालय,अमरावती येथील कर्मचारी श्री. पांडे यांची माझेकडे 400/- रुपये लाचेची मागणी असल्याचे दिसून आले. त्यानंतर श्रीमती पंधरे यांनी आता आपण श्री.पांडे यांचेविरुध्द लाचेचा सापळा आयोजित करणार असल्याचे सांगुन मला लाच रक्कम म्हणून 400 रुपये हजर करण्याचे सांगितलेनुसार मी 100 रुपये दराच्या 4 नोटा हजर केल्या. त्यानंतर पो.नि.पंधरे यांचे निर्देषानुसार पो. कॉं.थोरात यांनी सदर नोटांना त्यांचेकडील पावडर लावुन त्या पावडरचा उपयोग व गुणधर्म आम्हाला समजावून सांगितले. त्यानंतर मला व पंचाना आवश्यक त्या सुचना देवून श्री.पांडे यांनी माझेकडून लाच स्विकारल्याचा इशारा देणेबाबत सांगुन माझेजवळ लाच रक्कम देवून व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन दिले. त्यानंतर मी, पंच क्र.1 श्री.रामटेके यांचेसह व पो.नि.पंधरे हया पंच क्र.2 श्री.माथुरकर व स्टाफसह आमचे मागोमाग तहसिल कार्यालय, अमरावती येथे श्री.पांडे यांचेविरुध्द सापळा कारवाईकामी रवाना झालो. त्यानंतर मी, पंच क्र.1 श्री.रामटेके व सापळा पथक असे तहसिल कार्यालय, अमरावती येथे पोहचलो. त्यावेळी मी श्री.पांडे यांना फोन करुन ते कोठे आहेत याबाबत विचारणा केली असता त्यांनी ते अभिलेख कक्षात असल्याचे सांगितले. त्यावेळी पो.नि.पंधरे हया पंच क्र.2 व स्टाफसह सदर कार्यालयाचे बाहेरील बाजूस सापळा लावुन थांबल्या. त्यावेळी मी व पंच क्र.1 श्री.रामटेके असे तहसिल कार्यालय, अमरावती येथील अभिलेख कक्षात गेलो व मी श्री.पांडे यांचेकडे गेलो असता त्यांनी मला माझे कागदपत्रे देवून 'पाहुन घ्यायच का तुम्हाला' असे म्हटले व पैश्याबाबत हाताने इशारा केला. त्यामुळे मी त्यांना माझेजवळील लाच रक्कम 400/- रुपये त्यांचेकडे दिले व 'रुपये वगैरे व्यवस्थित आहे ना' असे म्हटले असता त्यांनी 'हा बरोबर बरोबर' असे म्हटले. त्यावेळी त्यांनी मला माझेकडून पैसे घेतल्याबाबत कोणतीही पावती दिली नाही. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.रामटेके यांचेसह अभिलेख कक्षाचे बाहेर येवून सापळा पथकास श्री.पांडे यांनी लाच स्विकारलेबाबतचा नियोजित इशारा केला. त्यानंतर पो.नि.पंधरे, पंच क्र.2 श्री.माथुरकर व स्टाफ तहसिल कार्यालयातील अभिलेख कक्षात येवून श्री.पांडे यांना ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती कार्यालयात आणले. अशाप्रकारे मी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान तहसिल कार्यालय, अमरावती येथील कर्मचारी श्री. पांडे यांनी माझे आई श्रीमती कमल सुरेष डकरे हिने तिचे वडील कै.नारायणराव पेटले यांचे मौजे बडनेरा, ता.जि. अमरावती सव्र्हे नं.68/2 मधील शेत जमीनीचे वादाबाबतचे प्रकरणाचे कागदपत्रे देणेकरीता यापुर्वी दिलेल्या 100/- रुपयाचे पावती व्यतीरिक्त 400/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान तहसिल कार्यालय, अमरावती येथील महसुल सहायक श्री.सारंग पांडे यांनी माझेकडून 400/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले आहे. तरी मी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी लोकसेवक सारंग विलास पांडे, वय 33 वर्ष, पद - महसुल सहायक, तहसिल कार्यालय, अमरावती, रा. दस्तुरनगर, अमरावती यांचेविरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेकरीता फिर्याद देत आहे. माझी वरील नमुदप्रमाणे फिर्याद संगणकावर टाईप केली असुन मी वाचुन पाहिली घडलेल्या घटनाक्रमानुसार बरोबर व खरी आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Ravi Sahebrao Zakarde
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

MANOJ S. DAKRE

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रत मिळाली
MANOJ S. DAKRE

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): VIJAYKUMAR VITTHA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ड्युटी ऑफिसर
सिटी कोतवाली, अमरावती शहर